Maharashtra Times
http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/25136556.cms

अक्षरनिष्ठांची दिवाळी

Nov 3, 2013, 12.00AM IST

>> मुकुंद कुळे

दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्राच्या साहित्यिक-सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वाची खूण! सुमारे एका शतकाची परंपरा लाभलेल्या दिवाळी अंकांनी आजवर वाचनसंस्कृती रुजवण्याचं मोलाचं काम केलं. पण गेली काही वर्षं समकालाशी आणि त्यातील प्रश्नांशी

जुळवून घेणं दिवाळी अंकांना काहीसं कठीण जात आहे. ही दरी अशीच वाढत राहिली, तर एक मोठी परंपरा लुप्त व्हायला वेळ लागणार नाही. दिवाळी अंकांच्या आजवरच्या वाटचालीचा आणि आजच्या स्थितीगतीचा वेध...

तीनच वर्षांपूर्वी दिवाळी अंक या परंपरेची शताब्दी साजरी झाली. १९०९ साली का. र. मित्र यांनी ' मनोरंजन ' चा पहिला दिवाळी अंक काढला, तेव्हा त्यांना कल्पनाही नसेल की, आपण सुरू केलेला हा साहित्यिक उपक्रम थेट शंभरी गाठेल! पण त्यांच्या या

साहित्यिक उपक्रमाने नुस्तीच शंभरी गाठलेली नाही, तर तो आज मराठी भूमीतील एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना झाला आहे. दिवाळी अंक नसतील, तर मराठी मनाला दिवाळी ही संकल्पनाच रुचणार नाही. मराठी माणसाला जितका दिवाळीतला खाद्यफराळ

प्रिय, तितकाच बौध्दिक भूक भागवणारा हा शब्दफराळही प्रिय आहे. कारण या दिवाळी अंकांनी आजवर मराठी जनांचं साहित्यिक-सांस्कृतिक भरणपोषण केलेलं आहे. त्यामुळेच आजही दिवाळीच्या आठवडाभर आधी बाजारात येणाऱ्या दिवाळी अंकांची मराठी

वाचक चातकासारखी वाट बघत असतात आणि शेकड्यांनी येणारे दिवाळी अंक निरखून-पारखून घेत असतात.

या पार्श्वभूमीवर दिवाळी अंकांची आजवरची सशक्त साहित्यिक-सांस्कृतिक धारा, दिवसेंदिवस अशक्त बनत चालली आहे; असं विधान केलं तर ते धाडसाचं ठरेल! पण ते करण्यावाचून गत्यंतर नाही. कारण गेल्या काही वर्षांत दिवाळी अंकाच्या संख्येत लक्षणीय भर

पडलेली असली, त्यांच्या बाह्य सजावटीत कमालीचा फरक पडलेला असला; तरी दिवाळी अंकांचा मूळ गाभा असलेलं साहित्य मात्र दिवसेंदिवस आपला आत्मा हरवत चाललं आहे. काही वर्षांपूर्वी दिवाळी अंक प्रसिध्द झाल्यावर काही महिन्यांनी, त्या वर्षातील

दिवाळी अंकातील वेचक मजकूर वेगळा काढून राम कोलारकर ' अक्षर दिवाळी ' नावाचं वेगळं पुस्तक प्रसिध्द करायचे. त्यांचा हा उपक्रम अनेक वर्षं सुरू होता. तेव्हा त्यांनी त्या ' अक्षर दिवाळी ' त प्रसिध्द केलेला मजकूर वाचताना आजही आपण काहीतरी ' अक्षर

' साहित्य वाचत आहोत, असं वाटत राहतं. त्यातील साहित्य काळालाही धोबीपछाड घालून शिल्लक राहिलेलं दिसतं. जी. ए. कुलकर्णींपासून व्यंकटेश माडगूळकरांपर्यंत आणि उध्दव शेळक्यांपासून अनिल अवचटांपर्यंत कितीतरी जणांचं साहित्य आजही अनेकांच्या

स्मरणात आहे. मात्र आज ' अक्षर दिवाळी ' सारखा प्रयोग कुणी केलाच, तर त्याच्या हाती किती ' अक्षर ' ऐवज लागेल, शंकाच आहे. कारण गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकात काय होतं, ते यावर्षी आपल्याला आठवत नाही.

अर्थात आताच्या दिवाळी अंकांत प्रकाशित होणारं सारंच साहित्य वाईट-कमअस्सल असतं, असं सरसकट विधान करता येणार नाही. परंतु वाचकांच्या केवळ जाणिवेतच नव्हे, तर नेणिवेतही जाऊन रुजलंय, असं साहित्य अलीकडच्या काळात फार कमी हाताशी

लागतं. कदाचित हा काळाचा परिणामही असू शकतो. साठ-सत्तर-ऐंशी ही दशकं जशी एकूण साहित्यासाठी पोषक होती, तशीच ती दिवाळी अंकांसाठीही पोषक होती. कारण याच काळात मोठ्या प्रमाणावर साहित्यिक-सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय उलथापालथी होत

होत्या. प्रत्येकाला आपल्या जाणिवा-संवेदना नव्याने तपासून पाहाव्या लागत होत्या. मग ती साठच्या दशकात झालेली महाराष्ट्र राज्याची झालेली स्थापना असो, साठ-सत्तरच्या दशकातच मराठी साहित्यात नव्याने झालेली दलित-ग्रामीण-स्त्रीवादी साहित्याची

सुरुवात असो, इंदिरा गांधी सरकारने लादलेली आणीबाणी असो किंवा रिडल्ससारखं प्रकरण असो. एकूणच सामाजिक उत्थानाचा हा काळ होता आणि तो त्या काळातील लेखकांनी आपल्या लेखनात पकडण्याचा प्रयत्न केला आणि त्याचंच प्रतिबिंब तत्कालीन

दिवाळी अंकांतही उमटलेलं दिसतं. मात्र १९९०नंतर भारतात आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरणाची आलेली लाट आणि या साऱ्याचा एकूणच जगण्यावर आणि जीवनशैलीवर मोठा परिणाम झालेला असतानाही, वाचकाला हादरवून सोडेल, त्याच्या काळजावर

प्राणांतिक खोल जखम करेल असं कुठलंच साहित्य ना दिवाळी अंकांत आलं, ना स्वतंत्रपणे प्रकाशित झालं. विदर्भ-मराठवाड्यात एवढ्या आत्महत्या झाल्या, त्याचं जणू सोयरसुतक नसल्यासारखंच साहित्य आजही दिवाळी अंकांत प्रसिध्द होतंय. दिवाळी अंकांतून

प्रसिध्द होणाऱ्या कवितांनी या प्रश्नांची दखल घेतली, पण लेख-कथा-कादंबऱ्यांतून या समस्यांचा खोलवर वेध कुणीच घेतलेला दिसत नाही. सदानंद देशमुख, आसाराम

लोमटे, कृष्णात खोत, अशोक कौतिक कोळी यांसारखे काहीजण दुष्काळ, शेतकऱ्यांच्या समस्या,

त्यांचं हलाखीचं जगणं यांचा वेध स्वतंत्रपणे आणि दिवाळी अंकांतूनही घेताना दिसतात. पण त्यांच्या लेखनाची तीव्रता दिवाळी अंकांच्या शहरी वाचकाला किती जाणवते हा प्रश्नच आहे.

आणि म्हणूनच दिवाळी अंक ही फक्त शहरी-मध्यमवर्गीय समाजाची साहित्यिक-सांस्कृतिक घटना आहे का, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. या प्रश्नाचं उत्तर एका अर्थाने ' हो ' असंच आहे. कारण शहरांतून दिवाळी साजरी होत असताना आणि मध्यमवर्गीय

वाचकांच्या दिवाळी अंकांवर उड्या पडत असताना, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मात्र कापणीचा हंगाम सुरू असतो. त्यांची ' दिवाळी ' देव दिवाळीला असते. नवान्न घरी आल्यावर ते दिवाळी साजरी करतात. अर्थात गेल्या काही वर्षांत खेड्यांचं निमशहर आणि

निमशहरांचं शहर होण्याची प्रक्रिया झपाट्याने सुरू असल्याने आता नाशिक, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, लातूर, नांदेड अशा शहरांतही मोठ्या प्रमाणावर दिवाळी अंक प्रसिद्ध होऊ लागले आहेत. मात्र आजवरच्या मोजक्याच दिवाळी अंकानी एकूणच महाराष्ट्रातील

सर्व पातळ्यांवरच्या वाचकांची चांगलं काही वाचण्याची जी भूक भागवली होती, ती भूक आजचे संपूर्ण महाराष्ट्रातून प्रसिध्द होणारे हजारो दिवाळी अंक भागवतात का, हा संशोधनाचा विषय आहे. आज लिहिणाऱ्यांची संख्या वाढलीय, त्यांच्यासाठी दिवाळी अंकांचं

व्यासपीठही उपलब्ध आहे, परंतु एखाद्या समस्येचा, कथाविषयाचा सर्वकष धांडोळा घेण्याचं प्रमाण फार अल्प आहे. याला कारण लिहिते लेखक आहेतच, पण त्याचबरोबर जाणते संपादक नाहीत, हेही एक कारण आहे. दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे, ज्या अंकांनी

आपली परंपरा निर्माण केलीय, त्या अंकानी काळानुरूप आपल्यात न केलेला बदल.

खरंतर विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत बहुतेक दिवाळी अंक ट्रॅकवर होते. त्यांनी मराठी वाचकांची रुची जाणीवर्पूक घडवली होती आणि त्याला काळानुरूप आपल्या स्वरूपात केलेला केलेला बदल कारणीभूत होता. उदाहरणार्थ विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात

'मनोरंजन'-'करमणूक' या नियकालिकांनी दिवाळी अंकाची पायाभरणी केली. त्यावेळी फडके-खांडेकरांपासून केशवसुत-गोविंदाग्रजांपर्यंत ते ग.त्र्यं. माडखोलकर-र.वा. दिघ्यांपासून भा.रा. तांबे-माधव ज्युलियनांपर्यंत अनेक नामवंत कथा-कादंबरीकर व कवींनी त्यावेळच्या

वेगवेगळ्या दिवाळी अंकांतून महत्वाचं लेखन केलेलं दिसतं. दिवाळी अंकांचा हा रूपबंध अगदी पन्नास-साठच्या दशकापर्यंत ठरून गेला होता. १९४०च्या आसपास मराठीत 'सत्यकथा', 'आलोचना', 'अभिरूची', 'हंस', अशी साहित्यिक नियतकालिकं सुरू झाली. या

मासिकांतून नवसाहित्याला मुक्त व्यासपीठ मिळू लागलं आणि त्यांनी दिवाळी अंकाच्या स्वरूपातही अंतर्बाह्य बदल केले. मुख्य बदल होता, तो आशयातला. तोपर्यंतच्या साहित्यात कथात्मता असली तरी ते एकप्रकारे दीर्घ आणि बाळबोध वाटावं, या पध्दतीचं लेखन

होतं. पण पन्नासच्या दशकांत विविध अनियकालिकांतून बा.सी. मर्ढेकरांपासून पु. शि. रेग्यांपर्यंत आणि नवकथेचे जनक असलेले गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर या साऱ्यांनी लेखन करायला सुरुवात केली. त्यांचं

प्रतिमा-प्रतीकयुक्त लेखन वाचकांना आवडण्यासाठीची पार्श्वभूमी तत्कालीन दिवाळी अंकांनीच निर्माण केली. तेव्हा साहित्याच्या लेखनापासून-वाचनापर्यंतच्या लेखक-वाचकांच्या अभिरुचीत आमूलाग्र बदल होण्याचं मुख्य कारण होतं- दुसरं महायुद्ध. दुसऱ्या जागतिक

महायुद्धानंतर यंत्रवादाचा जागर झाला आणि एकूणच भारतीय मानसिकतेत मोठा बदल झाला. हा बदल तेव्हाच्या लेखक-कवींच्या लेखनातून झालेला बघायला मिळतो. त्यांचं हे नावीन्यपूर्ण लेखन प्रामुख्याने दिवाळी अंकांतच झालेलं आहे. त्यामागे तत्कालीन

लेखकांची समयसूचकता होती, तशीच संपादकांचीही.

नवलेखकांच्या साहित्याला दिवाळी अंकांचं व्यासपीठ मिळालं आणि पुढे साठ-सत्तरच्या दशकापर्यंत दिवाळी अंकांचं एक प्रारूप ठरून गेलं. कथा, कविता, एक-दोन परिसंवाद, ललित लेख आणि काही व्यक्तिचित्रं असं त्याचं स्वरूप झालं आणि नंतर कित्येक वर्ष

तोच दिवाळी अंकाचा साचा ठरून गेला. मात्र मराठी साहित्यासाठी आश्वासक वातावरण तयार करण्याचं काम दिवाळी अंकांनी याच काळात केलं. कारण मराठी साहित्यात मोलाची भर टाकणारं लेखन याच काळात दिवाळी अंकांतून झालं. कारण वर्षभरात जे काही

चांगलं सुचलं असेल, ते दिवाळी अंकांसाठी राखून ठेवण्याची प्रथा तेव्हाच सुरू झाली होती.

पण नवीन ते कालांतराने जुनं होतंच. दिवाळी अंकांचाही एक साचा ठरून गेला. त्याला धक्का देण्याचं काम ऐंशी-नव्वदच्या दशकात सुरू झालेल्या दिवाळी अंकांनी केलं. तोवरच्या दिवाळीं अंकातून वाचकांची दर्जेदार वाचनाची भूक भागत होती. मात्र दर्जेदार वाचन

वेगळं आणि वैचारिक भूक भागवणारं लेखन वेगळं, हे ध्यानात आल्यानेच नंतरच्या काळात 'साप्ताहिक दिनांक', 'अक्षर', 'आजचा चार्वाक' हे दिवाळी अंक बाजारात आले. हे दिवाळी अंक केवळ आशयदृष्ट्या वेगळे नव्हते. लेखनतंत्रापासून मांडणीपर्यंत त्यांनी

वेगवेगळे प्रयोग केले होते. 'दिनांक' दिवाळी अंकाने तर एके वर्षी अश्लील कवितांचा खास विभाग केला होता आणि त्यात तुकारामांपासून मर्ढेकर-ढसाळ-कोलटकरांपर्यंत अनेकांच्या अश्लील कविता छापल्या होत्या. अर्थात अश्लीलता हे काही त्या कवितांचं व्यवच्छेदक

लक्षण नव्हतं, तर लैंगिकता हीदेखील एक मानवीभावना असून तिच्याकडे सभ्य-असभ्यतेच्या पलीकडे जाऊन पाहिलं पाहिजे, हे ठसवण्याचा संपादकांचा हेतू होता. तसंच तोपर्यंत दिवाळीअंकांचा आणि चित्रकारांचा संबंध प्रामुख्याने फक्त मुखपृष्ठापर्यंतच यायचा. पण

दिनांक, अक्षर, चार्वाक या दिवाळीअंकांनी चित्रकारांच्या चित्रांना आणि लेखणीलाही वाव दिला आणि तेव्हापासून आजतागायत ट्रेण्ड सुरू आहे. याच काळात ' अबकडई ' सारखा भन्नाट दिवाळी अंकही सुरू झाला. चंद्रकांत खोतांच्या अगम्य मनोविश्वासारखंच या

दिवाळी अंकाचं स्वरूप असायचं. पत्र, अंतीद्रिय अनुभव अशा वेगळ्याच, पण एकाच विषयाला हा अंक वाहिलेला असायचा. तीच परंपरा आता ऋतुरंगने धरून ठरवलीय.

दिवाळी अंकांच्या स्वरूपात झालेला हा बदल मूळ संपादकांच्या नव्या दृष्टीतला बदल होता. अर्थात हा बदल साऱ्याच दिवाळी अंकांनी स्वीकारला नाही. ते फक्त आशयाला चिकटून राहिले. परिणामी आजही केवळ कथा-कविता, ललित-वैचारिक लेख, एखादा परिसंवाद

असं जुनं रूपच या दिवाळी अंकांनी जपून ठेवलंय. पण ते करतानाही पूर्वीच्या संपादकांचा संपादकीय विचक्षणपणा आता उरलेला नाही. एखाद्या लेखावर-कथेवर काम करून घेण्याचा अधिकार गाजवताना कुणी संपादक दिसत नाही. हा दोष केवळ संपादकांचा नाही,

पण आजच्या लेखकांचीही तेवढी तयारी नसते. त्यांना एकदाचं लेखन देऊन मोकळं व्हायचं असतं आणि म्हणूनच पूर्वी दिवाळी अंकांनी राखलेला आब, आताच्या दिवाळी अंकांच्या हातातून निसटण्याच्या मार्गावर आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर दिवाळी अंकातील आशयाबाबत प्रयोग करण्याचा प्रयत्न फारच कमी जण करताना दिसत आहेत. अशा अपवादात्मक दिवाळी अंकात अनुभव, मुक्त शब्द, इत्यादी, साधना, महाराष्ट्र टाइम्स या दिवाळी अंकांचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. हे

दिवाळी अंक लेखनाबाबत आणि विषयाबाबतही वेगळेपणा आणण्याचा जाणीवर्पूक प्रयत्न करताना दिसत आहेत. उदाहरणार्थ 'मुक्त शब्द'च्या दिवाळी अंकात गेल्या काही वर्षांत हाताळण्यात आलेले नायक, खलनायक, विचारतुला यांसारखे विषय. 'अनुभव' तर कायम

बदलत्या जीवनशैलीचं भान दाखवत आलं आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'चा दिवाळी अंकदेखील कायम समकालाला समांतर असतो. जुन्या घटनांचा धांडोळा घेतानाच विद्यमान आणि भविष्याचा वेधही महाराष्ट्र टाइम्सचा दिवाळी अंक नेहमी घेत आला आहे. यंदाच्या

अंकातील ' सृष्टीभानाच्या गोष्टी ' हा पर्यावरणसंबंधी विभाग हेच अधोरेखित करतो.

...तरीही आजही मौज, दीपावली, पद्मगंधा, आशय, हंस, नवल, मोहिनी असे कितीतरी दिवाळी अंक आपली लोकप्रियता आणि वाचनीयता टिकवून आहेत. त्यांनीच आजवरची वाचनसंस्कृती घडवलेली आहे. पण जगण्यातील नव्या बदलाला, लेखनातून सामोरं

जाण्याचं भानही त्यांनीच दाखवायला हवं... कारण त्यांचंच अनुकरण इतर दिवाळी अंक करतात!

सांगीतिक दिवाळी अंक

संगीत या विषयाला वाहिलेला ' सप्तसूर ' दिवाळी अंक यंदा वाचकांचं लक्ष वेधून घेत आहे. संगीतकार कमलेश भडकमकर यांच्या ' मनसा ' संस्थेची निर्मिती असलेला आणि गीतकार वैभव जोशी यांनी संपादित केलेला हा अंक रसिक साहित्य, पुणे यांनी प्रसिद्ध

केला आहे. दिवाळी अंकांमध्ये संगीत विशेषांक अनेक जण काढतात, पण हा अंक केवळ विशेषांक नाही तर तो पूर्णतः संगीत या विषयाला वाहिलेला असून संगीत क्षेत्रातील जाणकारांनी निर्माण केला आहे. या अंकाच्या संकल्पनेला साजेसे सा रे ग म प ध नी सा

असे सात विभाग पाडण्यात आले असून ' सा ' म्हणजे सार्थ, ' रे ' म्हणजे रेशीमबंध, ' ग ' म्हणजे गरज, ' म ' म्हणजे मर्म, ' प ' म्हणजे परमप्रिय, ' ध ' म्हणजे धमाल, ' नी ' म्हणजे निवडक आणि वरचा ' सा ' म्हणजे सादर असं या विभागांचं नामकरण

करण्यात आलं आहे. ' सार्थ ' विभागात संगीत सेवेत आयुष्याचं सार्थक केलेल्या दिग्गज, महनीय व्यक्तींच्या आयुष्याचा वेध घेण्यात आला आहे. ' रेशीमबंध' विभागात जुन्या गाजलेल्या गाण्यांच्या जन्मकथा त्या गाण्यांच्या जन्मदात्यांनी सांगितल्या आहेत. ' गरज

' या विभागात आज मराठी संगीताला मार्केटिंगची कशी गरज आहे याचा ऊहापोह करण्यात आला आहे. ' मर्म ' या विभागात सध्याच्या टॉप टेन नॉन फिल्मी गाण्यांच्या कथा असून त्या गाण्यांचं मर्म उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ' परमप्रिय ' या

विभागात ज्येष्ठ संगीतकारांनी त्यांच्या आवडत्या संगीतकारांना लिहिलेली पत्रं वाचकांना वाचायला मिळणार असून त्यातून एक वेगळंच भावविश्व उलगडण्यात आलं आहे. अंक वाचताना वाचकांचं थोडंस मनोरंजन व्हावं याद्दष्टीने ' धमाल ' या विभागात सांगीतिक

शब्दकोडी, विडंबन गीतं, विनोदी लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. तर ' निवडक ' हा विभाग जुने फोटो, जुन्या आठवणींनी सजविण्यात आला आहे. शेवटचा ' सादर ' हा विभाग नव्या पिढीच्या सांगीतिक सादरीकरणाची माहिती देणारा आहे. संगीत क्षेत्रातील

अनेक दिग्गज संगीतकार, कवी, गायक यांनी या अंकाला हातभार लावून तो सजवला आहे. केवळ दिवाळीपुरता हा अंक मर्यादित नसून, तो केव्हाही वाचता यावा याद्दष्टीने तयार करण्यात आला आहे आणि म्हणूनच या आगळ्यावेगळ्या अंकाची उपयुक्तता अधिक

असणार आहे.

ऑनलाइन दिवाळी अंक

ऑनलाईन दिवाळी अंकांचा ट्रेण्ड याही वर्षी कायम आहे. अनेक सोशल नेटवर्किंग साईट्सनी त्यांचे दिवाळी अंक इंटरनेटवर टाकले आहेत. दर महिन्याला व्हिडिओ मॅगझिन काढणारे शिवा घुगे यांनी यावर्षी ' संस्कृती ' हा विषय घेऊन ऑनलाईन दिवाळी अंक

तयार केला आहे. व्हिडीओ स्वरूपात हा अंक लवकरच प्रकाशित होणार आहे. याशिवाय वेबदुनिया, मायबोली, बुकगंगा डॉट कॉम, विदेशातील मराठी मंडळांचे दिवाळी अंक इंटरनेटवर झळकू लागले आहेत.